दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड महाराष्ट्र | रविवार, 30 ऑगस्ट 2026 | अंक क्र. 112 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे
WEBSITE : ATULYAMAHARASHTRA.COM RNI RGN NO. MAH/MAR 2023/52446 EMAIL : DAILYATULYAMAHARASHTRA@GMAIL.COM

# टाकळीवाडीत गॅस वाहिनीला गळती; खबरदारी म्हणून समृद्धी महामार्गावरील वाहतूक वळवली

■ छत्रपती संभाजीनगर : वृत्तसंस्था

गंगापूर तालुक्यातील टाकळीवाडी येथे गेल कंपनीच्या गॅस वाहिनीला गळती लागल्याने प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून समृद्धी महामार्गावरील वाहतूक पर्यायी मार्गाने वळवली आहे. साखळी क्रमांक ४४७ ते ४७०, म्हणजेच हडस पिंपळगाव ते माळीवाडा दरम्यानची सुमारे ३० किलोमीटरची वाहतूक धुळे-सोलापूर महामार्गावरून वळविण्यात आली आहे.

मुंबईकडून जाणारी वाहतूक :

मुंबईच्या दिशेने जाणारी वाहने हडस पिंपळगाव इंटरचेंजवरून समृद्धी महामार्गावरून उतरून धुळे-सोलापूर महामार्गावरून माळीवाडा येथे पुन्हा समृद्धी महामार्गावर प्रवेश करतील.

नागपूरकडून येणारी वाहने माळीवाडा इंटरचेंजवरून धुळे-सोलापूर महामार्गावर वळविण्यात येतील आणि हडस पिंपळगाव येथून पुन्हा समृद्धी महामार्गावर प्रवेश करतील. खबरदारीच्या दृष्टीने वाहतूक वळविण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिली.

दरम्यान, गेल कंपनीच्या तज्ज्ञांनी गॅस वाहिनीच्या दोन्ही बाजूंचे व्हॉल्व्ह बंद केले असून, पाइपलाइनमधील दाब कमी होत आहे. परिस्थिती नियंत्रणात आणून वाहतूक लवकरात लवकर सुरळीत करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू आहेत. जिल्हाधिकारी तसेच पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.



# रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वावर जपला आपुलकीचा स्नेहबंध

## गोरगरीब, वंचित व भटक्या-विमुक्त भगिनींसोबत आ. सुरेश धस यांनी साजरा केला रक्षाबंधनाचा सण

■ आष्टी प्रतिनिधी



रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त आष्टी विधानसभेचे भाजप आमदार सुरेश धस यांच्या अद्वैतचंद्र निवासस्थानी यंदाही रक्षाबंधनाचा सण आपुलकी, प्रेम आणि स्नेहाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

सालाबादप्रमाणे यंदाही गोरगरीब, वंचित तसेच भटक्या-विमुक्त समाजातील असंख्य भगिनींनी आमदार सुरेश धस यांच्या मनगटावर राखी बांधून रक्षाबंधनाचा सण उत्साहात साजरा केला. भगिनींनी व्यक्त केलेल्या प्रेमाचा आणि जिव्हाळ्याचा सन्मान म्हणून प्रत्येक भगिनीला साडी-चोळी व फळे देऊन आदरपूर्वक सन्मान करण्यात आला.

रक्षाबंधनाच्या निमित्ताने केवळ राखीचा धागा बांधला गेला नाही, तर समाजातील वंचित घटकांशी असलेला आपुलकीचा आणि माणुसकीचा स्नेहबंध अधिक दृढ करण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

भगिनींच्या चेहऱ्यावर दिसणारे समाधान, आनंद आणि प्रेम हेच या रक्षाबंधन सोहळ्याचे खरे वैशिष्ट्य ठरले. राखीच्या या पवित्र धाग्याने जपलेला स्नेहबंध सदैव दृढ राहावा आणि प्रत्येक भगिनीच्या आयुष्यात सुख, समाधान, आनंद व समृद्धी नांदावी, अशी मनःपूर्वक सदिच्छा आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केली. "रक्षाबंधन हा केवळ भाऊ-बहिणीच्या नात्याचा सण नसून प्रेम, विश्वास, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण आहे. माझ्या सर्व भगिनींचे प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे," अशी भावना आ. सुरेश धस यांनी व्यक्त केली. यावेळी अद्वैतचंद्र निवासस्थानी रक्षाबंधनासाठी आलेल्या भगिनींमध्ये आनंदाचे आणि भावनिक वातावरण पाहायला मिळाले. सर्व भगिनींना आमदार सुरेश धस यांच्याकडून रक्षाबंधनाच्या हार्दिक शुभेच्छा!

# अंबाजोगाईत भरदिवसा कारची काच फोडून दोन लाखांवर डल्ला; दुचाकीवरून आलेले चोरटे सीसीटीव्हीत कैद

■ अंबाजोगाई प्रतिनिधी :




अंबाजोगाई शहरातील लातूर रोडवरील साईनाथ स्मार्टसिटी परिसरात भरदिवसा कारची काच फोडून अज्ञात चोरट्यांनी तब्बल दोन लाख रुपयांची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अंबाजोगाई शहर पोलिसांनी दोन अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

साईनाथ स्मार्टसिटी, लातूर रोड येथे राहणारे वजनकाटा व्यावसायिक जोतीराम पांडुरंग भिसे (वय ४५) यांनी बँक ऑफ इंडियाच्या अंबाजोगाई शाखेतून दोन लाख रुपये रोख काढले होते. ही रक्कम पांढऱ्या रंगाच्या पिशवीत ठेवून त्यांनी ती आपल्या कारच्या डाव्या बाजूच्या सीटवर ठेवली. त्यानंतर घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये कार उभी करून ते जेवणासाठी घरात गेले.

काही वेळाने ते खाली आले असता कारच्या पुढील डाव्या बाजूच्या दरवाजाची काच फुटलेली दिसली. कारमध्ये ठेवलेली रोकड असलेली पिशवीही गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता मोटारसायकलवरून आलेल्या दोन अज्ञात इसमांनी कारची काच फोडून रोकड असलेली पिशवी घेऊन पळ काढल्याचे समोर आले. या चोरीत दोन लाख रुपयांची रोकड लंपास झाली असून, कारच्या काचेचे अंदाजे दहा हजार रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी जोतीराम भिसे यांच्या फिर्यादीवरून अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात दोन अज्ञात इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम ३०३(२) व ३२४(१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार पिराजी व्यंकटी गुट्टे करीत आहेत. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांकडून चोरट्यांचा शोध सुरू आहे.

# आ. संग्राम जगताप, माजी आ. नितीन पवार यांनी घेतले श्री मच्छिंद्रनाथांचे दर्शन

## आ. सुरेश धस यांनी केले स्वागत; भव्यदिव्य मंदिर जीर्णोद्धाराच्या कामाची पाहणी

■ आष्टी (प्रतिनिधी)


श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान, सावरगाव (मायंबा) येथे शनिवारी अहिल्यानगरचे आमदार संग्राम भैय्या जगताप आणि माजी आमदार नितीनराव पवार यांनी भेट देत श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी देवस्थान परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थानचे विश्वस्त तथा आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी आ. संग्राम जगताप व माजी आ. नितीन पवार यांचे देवस्थानमध्ये स्वागत केले. मान्यवरांनी श्री मच्छिंद्रनाथ महाराजांच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले.

यानंतर अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप व नाशिकचे माजी आ. नितीन पवार यांनी देवस्थान परिसरात सुरू असलेल्या भव्यदिव्य मंदिर जीर्णोद्धार व उभारणीच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. मंदिराचे भव्य स्वरूप, सुरू असलेली विविध विकासकामे, भाविकांसाठी निर्माण करण्यात येणाऱ्या सुविधा तसेच परिसराच्या सुशोभीकरणाची त्यांनी माहिती घेतली.

मंदिराची उभारणी अत्यंत सुंदर आणि नियोजनबद्ध पद्धतीने आकार घेत असल्याचे पाहून मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. आगामी काळात श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान हे अधिक भव्य, आकर्षक आणि भाविकांसाठी सर्व सुविधांनी युक्त तीर्थक्षेत्र म्हणून विकसित होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी विश्वस्त आ. सुरेश धस यांनी देवस्थानच्या सर्वांगीण विकासासाठी हाती घेतलेल्या विविध उपक्रमांची तसेच भव्य मंदिर जीर्णोद्धाराच्या कामाची सविस्तर माहिती आ. संग्राम जगताप व माजी आ. नितीन पवार यांना दिली. भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांचीही त्यांनी माहिती दिली.



## संपादकीय

### आव्हान समान ऊर्जावाटपाचे

आज भारताकडे ऊर्जा क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करण्याची क्षमता आहे; मात्र देशातील प्रत्येक घर, शेत, शाळा आणि रुग्णालयाला समान गुणवत्तेची वीज मिळेल तेव्हाच त्या नेतृत्वाला खरी प्रतिष्ठा मिळेल. ऊर्जा सुरक्षा हा प्रवासाचा पहिला टप्पा होता. आता ऊर्जा न्याय हेच भारताच्या विकासाचे पुढील ध्येय असले पाहिजे. कारण विजेचा प्रकाश केवळ बल्ब नाही, तर समाजातील संधी, समानता आणि विकासाची नवी दिशा उजळवतो.

भारताने गेल्या दशकभरात ऊर्जा क्षेत्रात केलेली प्रगती जगासाठी अभ्यासाचा विषय ठरली आहे. एके काळी वीजटंचाई, भारनियमन आणि अपुऱ्या उत्पादनामुळे ओळखला जाणारा भारत आज जगातील सर्वाधिक वेगाने ऊर्जा क्षमता वाढवणाऱ्या देशांमध्ये गणला जातो. कोळशावर आधारित प्रकल्पांबरोबरच सौर, पवन, जल आणि अणुऊर्जा या क्षेत्रांमध्ये मोठी गुंतवणूक झाली आहे. देशाची एकूण स्थापित वीजनिर्मिती क्षमता दुपटीहून अधिक वाढली आहे. राष्ट्रीय वीजग्रीडची क्षमता विस्तारली आहे. नवीकरणीय ऊर्जेतील भारताची झेप जागतिक पातळीवर कौतुकास्पद मानली जात आहे; मात्र या सर्व यशामागे एक मूलभूत प्रश्न आजही अनुत्तरित आहे, तो म्हणजे देशात पुरेशी वीज निर्माण होत असली, तरी प्रत्येक नागरिकापर्यंत समान गुणवत्तेने पोहोचते का? हा प्रश्न केवळ तांत्रिक नाही, तर सामाजिक, आर्थिक आणि लोकशाही मूल्यांशी संबंधित आहे. कारण ऊर्जा म्हणजे केवळ उद्योगधंद्यांचे इंधन नाही, तर ती शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार आणि सन्मानपूर्वक जगण्याचा पाया आहे. त्यामुळे भारताच्या ऊर्जाधोरणाचा पुढील टप्पा केवळ ‘ऊर्जा सुरक्षा’ नसून ‘ऊर्जा न्याय’ असला पाहिजे. गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र सरकारने ऊर्जा क्षेत्रात मोठी गुंतवणूक केली. ग्रामीण विद्युतीकरणाला गती मिळाली. घराघरांमध्ये वीज जोडणी देण्याची मोहीम राबवण्यात आली.(Solar-powered) विशेष भर देण्यात आला. आज देशाची एकूण वीजनिर्मिती क्षमता ५२० गीगावॉटपेक्षा अधिक झाली आहे. त्यापैकी निम्म्याहून अधिक क्षमता जीवाश्म इंधनाव्यतिरिक्तच्या स्रोतांमधून उपलब्ध होत आहे.

भारताने हवामानबदलाच्या पार्श्वभूमीवर हरित ऊर्जेच्या दिशेने महत्त्वपूर्ण वाटचाल केली आहे. त्यामुळे ऊर्जा संक्रमणाच्या जागतिक चर्चेत भारताचे स्थान अधिक मजबूत झाले आहे; मात्र राष्ट्रीय पातळीवरील ही प्रगती प्रत्येक गावात, प्रत्येक शेतात आणि प्रत्येक घरात सारखीच अनुभवाला येते, असे म्हणता येणार नाही. अनेक दुर्गम आदिवासी भाग, डोंगराळ प्रदेश आणि सीमावर्ती गावे आजही खंडित वीजपुरवठ्याच्या समस्येला सामोरे जात आहेत. शहरात रोहित्र बिघडल्यास काही तासांमध्ये दुरुस्ती होते; परंतु ग्रामीण भागात अनेकदा दोन-दोन दिवस वीजपुरवठा खंडित राहतो. शेतीपंपांसाठी रात्रीच्या वेळी वीज दिली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांना रात्रभर जागून पाणी द्यावे लागते. अनेक गावांमध्ये कमी दाबामुळे मोटारी चालत नाहीत. याचा थेट परिणाम शेतीच्या उत्पादकतेवर होतो. देशात शंभर टक्के घरांना वीजजोडणी मिळाल्याचा दावा केला जातो; परंतु मीटर बसवणे आणि चोवीस तास दर्जेदार वीज मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. अनेक घरांमध्ये जोडणी आहे; पण अनियमित पुरवठा, कमी व्होल्टेज किंवा वारंवार होणाऱ्या खंडित सेवेमुळे त्या जोडणीचा अपेक्षित फायदा होत नाही. ऊर्जा न्याय म्हणजे केवळ वीज उपलब्ध असणे नव्हे, तर ती विश्वासार्ह, सुरक्षित आणि परवडणारी असणेही तितकेच महत्त्वाचे आहे.(India)

ऊर्जा क्षेत्रातील दुसरी मोठी समस्या म्हणजे वितरण व्यवस्थेतील विषमता. महानगरांमध्ये खासगी वितरण कंपन्यांमुळे ग्राहक सेवा, ऑनलाइन बिलिंग आणि तक्रार निवारणामध्ये सुधारणा झाली आहे; परंतु ग्रामीण आणि लहान शहरांमध्ये अजूनही जुन्या तारांचे जाळे, अपुरी उपकेंद्रे, कमी क्षमतेची रोहित्रे आणि देखभालीचा अभाव ही वास्तवस्थिती आहे. परिणामी, राष्ट्रीय स्तरावर उत्पादन वाढले असले, तरी वितरणातील कमतरतेमुळे अंतिम ग्राहकाला त्याचा पूर्ण लाभ मिळत नाही. वीजवितरण कंपन्यांच्या आर्थिक सुधारणांवर गेल्या काही वर्षांमध्ये विशेष भर देण्यात आला आहे. तांत्रिक आणि व्यापारी तोटे(Technical and commercial disadvantages) कमी झाले आहेत. अनेक कंपन्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे; परंतु कोणत्याही वितरण कंपनीचे यश तिच्या नफ्यावर मोजता येत नाही. तिचे खरे यश गरीब, शेतकरी, लघुउद्योजक आणि दुर्गम भागातील नागरिकांना सातत्यपूर्ण वीज उपलब्ध करून देण्यात आहे. आर्थिक सुधारणा झाल्या आणि सेवा निकृष्टच राहिली, तर त्या सुधारणांचा सामान्य नागरिकाला काय उपयोग? वीज वितरणामध्ये राजकीय हस्तक्षेप ही आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक राज्यांमध्ये वीजदर हे आर्थिक वास्तवापेक्षा राजकीय समीकरणांवर ठरतात. मोफत वीज, अनुदाने आणि थकबाकीमुळे वितरण कंपन्यांवर आर्थिक ताण वाढतो. सरकारकडून अनुदानाची रक्कम वेळेवर न मिळाल्यास पायाभूत सुविधांच्या देखभालीवर परिणाम होतो. परिणामी ग्राहकांना दर्जेदार सेवा देण्यात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे ऊर्जा क्षेत्रात आर्थिक शिस्त आणि सामाजिक जबाबदारी यांचा समतोल आवश्यक आहे.

आज भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत आहे. उद्योग, डेटा सेंटर, कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहने आणि डिजिटल सेवा यामुळे विजेची मागणी सातत्याने वाढत आहे. अशा वेळी उपलब्ध वीज प्रथम कोणाला द्यावी, असा प्रश्न निर्माण होतो. मोठ्या उद्योगांना वीज आधी द्यावी की ग्रामीण रुग्णालयांना, औद्योगिक कॉरिडॉरना की सिंचन प्रकल्पांना असे प्रश्न उभे राहतात. हा केवळ आर्थिक प्रश्न नाही, तर सामाजिक न्यायाचाही प्रश्न आहे. उद्योगांना वीज मिळाली तर उत्पादन वाढेल, रोजगार निर्माण होतील आणि महसूल वाढेल हा युक्तिवाद योग्य आहे; पण दुसरीकडे ग्रामीण दवाखान्यात वीज नसल्यामुळे शस्त्रक्रिया थांबत असतील, विद्यार्थ्यांना अभ्यास करता येत नसेल किंवा शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी मिळत नसेल तर विकासाचे चित्र अपूर्ण राहते. म्हणूनच ऊर्जा धोरणाने आर्थिक वाढ आणि सामाजिक समता या दोन्ही उद्दिष्टांचा समतोल साधला पाहिजे. भारताने सौरऊर्जेच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र, तामिळनाडू आणि इतर राज्यांमध्ये मोठे सौरऊर्जा प्रकल्प उभे राहत आहेत. छतावरील सौरऊर्जा, हरित हायड्रोजन आणि ऊर्जा साठवणूक यांसारख्या क्षेत्रांमध्येही मोठ्या संधी उपलब्ध आहेत.

# अमली पदार्थ आणि सायबर सुरक्षेबाबत परळी लोहमार्ग पोलिसांकडून जनजागृती




■ अंबाजोगाई | प्रतिनिधी

अंबाजोगाई येथील वैभव करिअर अकॅडमीमध्ये परळी लोहमार्ग पोलीस स्टेशनच्या वतीने अमली पदार्थ विरोधी आणि सायबर सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

परळी लोहमार्ग पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी API जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली PSI काळे, पोलीस हवालदार अनंत कांबळे, पोलीस कॉन्स्टेबल गजानन टीमकीकर आणि महिला पोलीस अंमलदार मोहिनी बिकड यांनी स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

यावेळी अमली पदार्थांचे विविध प्रकार, व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक तसेच सामाजिक दुष्परिणाम याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. आजची तरुण पिढी व्यसनाच्या आहारी गेल्यास त्याचा परिणाम भविष्यातील पिढ्यांनाही भोगावा लागू शकतो. त्यामुळे अमली पदार्थांपासून दूर राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले.

तसेच सायबर गुन्हे, ऑनलाइन फसवणूक, सोशल मीडिया वापरताना घ्यावयाची काळजी, अनोळखी लिंक व संदेशांपासून सावध राहणे याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## लोकार्थ

### इपीएल लिमिटेडची दमदार कामगिरी महसुलात विक्रमी 25.3% वाढ

इपीएल लिमिटेड, पॅकेजिंग सोल्यूशन्स क्षेत्रातील जागतिक आघाडीची कंपनीने , 30 जून 2026 रोजी समाप्त झालेल्या पहिल्या तिमाहीचे आर्थिक निकाल जाहीर केले. कंपनीने 25.3% ची आतापर्यंतची सर्वाधिक महसूल वाढ नोंदवली. महत्त्वपूर्ण बाह्य आव्हाने आणि जागतिक बाजारपेठेतील सातत्यपूर्ण अस्थिरता असूनही ही कामगिरी कंपनीच्या व्यवसाय मॉडेलची लवचिकता, ग्राहकांशी असलेली मजबूत भागीदारी आणि शिस्तबद्ध अंमलबजावणी दर्शवते. ही सलग पाचवी तिमाही आहे ज्यामध्ये महसुलात दुहेरी अंकी वाढ झाली आहे, जी इपीएलच्या मजबूत मूलभूत स्थितीचे आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणीचे प्रतिबिंब आहे. वाढ सर्व स्तरांवर व्यापक होती. सौंदर्य प्रसाधन आणि ओरल केअर या दोन्ही श्रेणींमध्ये 20% पेक्षा अधिक वाढ झाली, तर सर्व क्षेत्रांनी दुहेरी अंकी वाढ नोंदवली. कच्च्या मालाच्या वाढलेल्या किमतींच्या पा सथ्रूपरिणामाचा विचार न करता, अंतर्निहित महसूल वाढ20% राहिली. एबिता मध्ये वर्षानुवर्षे15.2% वाढ झाली असून, इपीएलसाठी दुहेरी अंकी एबिता वाढीची ही सलग 15वी तिमाही आहे. EBITDA मार्जिन18.8%, तर अंतर्निहित EBITDA मार्जिन19.6% राहिले. कंपनीने सर्व क्षेत्रांमध्ये योग्य किंमत निर्धारणाच्या माध्यमातून वाढलेल्या खर्चाचा संपूर्ण परिणाम ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यात यश मिळवले.

### पेप्सिको इंडियाचा महाराष्ट्रात विस्तार

स्नॅक्स आणि पेयांच्या क्षेत्रातील प्रमुख कंपनी पेप्सिको इंडियाने पुण्यातील आपल्या मुख्य कारखान्याच्या 25 वर्षांचा प्रवास साजरा केला, महाराष्ट्रातील कंपनीचा दीर्घकालीन विकास आणि शाश्वत उत्पादनाच्या रणनीतीमध्ये हा कारखाना मुख्य आधारस्तंभ असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. 600 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीच्या बळावर, हा 15 एकराचा कारखाना एका स्थानिक केंद्रापासून प्रादेशिक पातळीवरील महत्त्वाचा उत्पादन केंद्र बनला आहे. याची वार्षिक उत्पादन क्षमता 62,100 टन असून, पश्चिम आणि दक्षिण भारतातील कोट्यवधी ग्राहकांसाठी लेज, कुरकुरे, चितोज, सॉलिड मस्ती आणि अंकल चिप्स यांसारखी प्रसिद्ध ब्रँड्स इथे तयार केली जातात.

हा टप्पा पेप्सिको इंडियाचे महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेसोबत असलेले घट्ट नाते स्पष्ट करतो. औद्योगिक उत्पादनापलीकडे जाऊन कंपनी राज्यातील एका मोठ्या सामाजिक-आर्थिक व्यवस्थेला पाठबळ देते. याद्वारे सुमारे 1,400 प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाले आहेत, स्थानिक लघु आणि मध्यम उद्योगांना चालना मिळाली आहे, तसेच महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात कृषी परिवर्तनाला गती मिळाली आहे.

■ संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे संपर्क -९८३३१४६३५

### दीपा ज्वेलर्सचा आयपीओ मंगळवारी खुला होणार

दीपा ज्वेलर्स लिमिटेडने ("कंपनी") आपल्या पहिल्या 'इनिशिअल पब्लिक ऑफर'साठी २ रुपये दर्शनी मूल्य असलेल्या इक्विटी शेअर्सकरिता १६८ ते १७७ रुपये प्रति शेअर असा किंमत पट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा 'इनिशिअल पब्लिक ऑफरिंग' अर्थात आय पी ओ सबस्क्रिप्शनसाठी मंगळवार, १ सप्टेंबर २०२६ रोजी खुला होईल आणि गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल.

गुंतवणूकदार किमान ८४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ८४ च्या पटीत बोली लावू शकतात. सध्या कंपनीचे ८,२०,००,००० इक्विटी शेअर्स अस्तित्वात आहेत.या ऑफरमध्ये २,५००.०० दशलक्ष रुपयांपर्यंतच्या नवीन शेअर्सची विक्री आणि प्रवर्तक भागधारकांकडून १,१८,४८,३४० इक्विटी शेअर्सपर्यंतच्या विक्रीचा समावेश आहे; यामध्ये आशिष अग्रवाल यांच्याकडून ५९,२४,१७० इक्विटी शेअर्स आणि सीमा अग्रवाल यांच्याकडून ५९,२४,१७० इक्विटी शेअर्सचा समावेश आहे.

### ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्युशनचा आयपीओ विक्रीसाठी खुला

ईएसडीएस सॉफ्टवेअर सोल्युशन लिमिटेडने (यापुढे “कंपनी”) आपल्या प्रारंभिक सार्वजनिक प्रस्तावासाठी (आयपीओ) दर्शनी मूल्य रु. १ असलेल्या प्रत्येक इक्विटी शेअरसाठी रु. ४०८/- ते रु. ४२९/- असा किंमत पट्टा निश्चित केला आहे.कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक प्रस्ताव (“आयपीओ” किंवा “इश्यू”) २८ ऑगस्ट, २०२६ रोजी वर्गणीसाठी खुला झाला असून १ सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल.गुंतवणूकदार किमान ३४ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर ३४ इक्विटी शेअर्सच्या पटीत बोली लावू शकतात.इश्यूपूर्वीचे एकूण इक्विटी शेअर्स: प्रत्येकी १ रुपयाचे १०,०४,२७,७५३ इक्विटी शेअर्स आहेत हा आयपीओ ७,२००.०० दशलक्ष रुपयांपर्यंतचा एक नवीन इश्यू आहे.२००५ मध्ये स्थापित, ही कंपनी भारतातील एआय-सक्षम क्लाउड, व्यवस्थापित सेवा, डेटा सेंटर पायाभूत सुविधा आणि सॉफ्टवेअर सोल्यूशन्स प्रदान करणारी कंपनी आहे. भारतात GPUaaS, क्लाउड, व्यवस्थापित सेवा, डेटा सेंटर पायाभूत सुविधा आणि सॉफ्टवेअर सोल्यूशन्सची संपूर्ण श्रेणी प्रदान करणाऱ्या केवळ दोन कंपन्यांपैकी ही एक आहे. शिवाय, या दोन्हींपैकी, आर्थिक वर्ष २०२६ मध्ये कामकाजातून मिळणाऱ्या महसुलाच्या बाबतीत ही सर्वात मोठी कंपनी आहे








# कलावंतांच्या अंधारमय आयुष्यात मायेचा प्रकाश पेरणारे एक 'झाड' : श्रीमती जयश्री पंढरीनाथ घुगे

**मुंबईसारखं अथांग, गजबजलेलं शहर... जिथे सुशिक्षितांचीही भंबेरी उडते, तिथे हातामध्ये एक जुनी पिशवी, डोळ्यात विस्कटलेली स्वप्नं आणि चेहऱ्यावर कमालीचा संकोच घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील एक वृद्ध, अशिक्षित लोककलावंत पहिल्यांदाच पाऊल ठेवतो. मंत्रालयाच्या आणि संचालनालयाच्या मोठमोठ्या इमारती, साहेब लोकांचे कडक चेहरे पाहून तो अधिकच गांगरून जातो. अशा वेळी एक हसरा चेहरा समोर येतो, त्या वृद्धाच्या खांद्यावर मायेने हात ठेवतो, त्याला बसवून पाण्याचा ग्लास देतो आणि म्हणतो, "बाबा, काळजी करू नका, तुमचं काम होईल..." हा आश्वासक चेहरा आणि मायेचा हात म्हणजेच सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथील सहायक संचालक श्रीमती जयश्री पंढरीनाथ घुगे!**

**येत्या ३१ ऑगस्ट २०२६ रोजी श्रीमती जयश्री घुगे मॅडम आपल्या प्रदीर्घ आणि ध्येयवेड्या शासकीय सेवेतून नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत. त्यांच्या सेवानिवृत्तीने प्रशासनातील एक कार्यक्षम अधिकारी निवृत्त होत नसून, राज्यातील हजारो वंचित, वृद्ध आणि अशिक्षित कलावंतांचा एक हक्काचा आधारवड अनंताच्या प्रवासाला निघाल्यासारखा भास होत आहे.**

### गावखेड्यातील कलेशी बांधलेली नाळ

जयश्री घुगे यांची शासकीय सेवेतील नियुक्ती झाली, तेव्हापासूनच त्यांनी आपल्या पदाला केवळ एक 'नोकरी' न मानता 'सेवाधर्म' मानले. महाराष्ट्राची संस्कृती ही गावखेड्यात, शाहिरीत, भारुडात, गोंधळात आणि पोवाड्यांत जिवंत आहे, याची त्यांना अचूक जाण होती. त्यामुळेच, मंत्रालयातून कलावंतांच्या हितासाठी घेतलेल्या प्रत्येक शासन निर्णयाची (GR) त्यांनी केवळ फाईल बंद करून ठेवली नाही, तर त्याची तात्काळ आणि काटेकोरपणे अंमलबजावणी केली. नियम आणि अटींच्या जंजाळात



कलावंतांचे हक्क अडकणार नाहीत, याची त्यांनी नेहमीच काळजी घेतली.

### डिजिटल क्रांती आणि कलावंतांचा सन्मान

पूर्वीच्या काळी वृद्ध कलावंतांना मानधनासाठी अनेक महिने वाट पाहावी लागायची, किंवा मुंबईच्या वाऱ्या कराव्या लागायच्या. जयश्री मॅडम यांनी ही व्यथा ओळखली. गावखेड्यातील दुर्गम भागात राहणाऱ्या, बँक व्यवहारांची माहिती नसलेल्या मंजूर कलावंतांच्या बँक खात्यावर सहजासहजी आणि थेट मानधनाचे पैसे जमा व्हावेत, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. प्रशासकीय प्रक्रियेचे सुलभीकरण करून त्यांनी हजारो वृद्ध कलावंतांच्या घरात दरमहा निश्चित प्रकाशाचा किरण पोहोचवला. त्यांच्या या डिजिटल आणि संवेदनशील प्रयत्नांमुळे अनेक कलावंतांना सन्मानाने जगता आले.

### मुंबईत बनल्या 'माऊली'

ज्या वृद्ध आणि अशिक्षित कलावंतांनी आयुष्यात कधी मुंबई पाहिली नव्हती, त्यांच्यासाठी जयश्री घुगे मॅडम म्हणजे मुंबईतील हुकमी पत्ता असायच्या. मुंबईत आल्यावर या कलावंतांना कुठे जायचे, कोणाला भेटायचे, कागदपत्रे कशी सादर करायची, काहीच समजत नसे. अशा वेळी घुगे मॅडमनी स्वतः पुढे होऊन त्यांना सर्वतोपरी मदत केली. केवळ शासकीय कामच नव्हे, तर त्यांच्या राहण्याची, खाण्यापिण्याची सोय करण्यापर्यंत त्यांनी अनेकदा वैयक्तिक पातळीवर मदत केली. एका सहायक संचालक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने शासकीय शिष्टाचार बाजूला ठेवून एका सामान्य लोककलावंताला दिलेली ही वागणूक प्रशासनात मैलाचा दगड ठरली.

### एक कधीही न विसरता येणारे योगदान

श्रीमती जयश्री घुगे यांनी आपल्या संपूर्ण सेवाकाळात केवळ सह्या केल्या नाहीत, तर माणसांची मने जोडली. त्यांनी शासकीय खुर्चीला एक मानवी चेहरा दिला. राज्यातील कलावंतांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्याचे आणि त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवण्याचे जे पुण्य त्यांनी कमावले आहे, ते शब्दांच्या पलीकडचे आहे.३१ ऑगस्ट रोजी त्या शासकीय सेवेतून अधिकृतपणे निवृत्त होतील. शासकीय नियमांनुसार त्यांची खुर्ची बदलेल, पण महाराष्ट्रातील हजारो कलावंतांच्या हृदयात असलेले त्यांचे अढळ स्थान कधीही बदलणार नाही. श्रीमती जयश्री पंढरीनाथ घुगे मॅडम यांना त्यांच्या पुढील समृद्ध, निरोगी आणि आनंदी सेवानिवृत्त आयुष्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील कलावंत परिवारातर्फे कोटी कोटी शुभेच्छा! मॅडम, तुमच्या संवेदनशील कार्याला मानाचा मुजरा!

**■ सायली फड**
**(रा. गोपाळवाडी ता. रेणापूर जि. लातूर )**

# एमपीएससी पेपर फुटीसह इतर पेपर फुटीचे प्रकार आस्मानावर आणि विद्यार्थ्यांच्या समस्या वाऱ्यावर

देशासह राज्यातील पेपर फुटी प्रकरणामुळे तरुण युवकांपुढे मोठ्या गंभीर आणि जटिल समस्या निर्माण झाल्या असून सरकारने त्यांना द्विधा मनस्थितीत नेऊन ठेवले आहे.त्यामुळे देश कुठे चालला हे कळता-कळेना एवढी मोठी भयावह परिस्थिती सरकारने युवा पिढीच्या बाबतीत देशात निर्माण करून ठेवली आहे.त्यामुळे सरकार तुपाशी आणि बेरोजगार युवक उपाशी अशी गंभीर समस्या सरकारने निर्माण केली आहे.त्यामुळे युवकांपुढे एकीकडे "विहिर तर दुसरीकडे खाई"अशी परिस्थितीत निर्माण झाली आहे.त्यामुळे "जाये तो जाये कहा" अशी भयावह परिस्थिती निर्माण झाली आहे.राज्यातील एमपीएससी पेपर फुटीमुळे असह्य वेदना होत असुन नौकरीच्या बाबतीत तरूणांचा सरकारवरील विश्वास हळूहळू कमी होतांना दिसत आहे.कारण नीट,सीईटी, टीईटी,न्यायपालिकेतील "टायपिंग स्किल" परीक्षा, औषध निरीक्षक पदभर्ती पाठोपाठ आता "एक्साईट" चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे.यावरून स्पष्ट होते की,राज्यात सर्वच स्तरावरील पेपर फुटीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून सर्वत्र जनूकाय अंधकार निर्माण झाला की काय असे सर्वत्र वातावरण दिसत आहे.कारण पेपर फुटीमध्ये पेपर काढणारे व राजकीय पुढारी यांची सर्वांचीच मिलीभगत असल्याचे दिसून येते त्यामुळेच हा प्रकार होत असावा किंवा सरकारी नौकरी भरतीच्या नावाखाली तरूणांची सरकार दिशाभूल तर करीत नाही ना असाही प्रश्न उपस्थित होत आहे.राज्यात वारंवार होत असलेल्या पेपर फुटीचा किंवा नौकरी भरतीचा होत असलेला गोंधळ पहाता असे वाटते की, राज्यातील सरकारी नौकरी भरती ही सरकारचे नाटक तर नाही ना!वारंवार पेपर फुटीच्या प्रकरणावरून असे वाटते की, सरकारला सरकारी नौकऱ्यांच्या रीक्त जागा भरायच्या आहे की नाही यात राज्याच्या जनतेच्या मनात शंका निर्माण होत आहे.कारण राज्यासह देशात सत्तेसाठी पक्ष फुटतांना आपण अनेकदा पाहिले आणि हा प्रकार नेहमीच होत असतो.परंतु सध्या राज्यात सर्वच स्तरावरील पेपर वारंवार फुटत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची मानसिकता खालावली असून त्यांच्या आयुष्यावर घणाघाती प्रहार होत आहे व अनेक जण डिप्रेशनमध्ये गेल्याचे दिसून येते.विद्यार्थांचा पेपर होतो पेपर चांगले जातात आणि नंतर अचानक पेपर फुटतो याला तर अजीबोगरीब कहानी म्हणावी लागेल.त्याचप्रमाणे हायकोर्टाच्या परिक्षेत ११५९२२ उमेदवार परीक्षा देतात त्यातून टायपिंग परीक्षेसाठी मेहनतीच्या बळावर राज्यात



११६१७ उमेदवार पात्र ठरतात आणि याही ठिकाणी सर्वच सेंटरवर मोठ्या प्रमाणात उमेदवार गोंधळतात यावरून स्पष्ट होते की, परीक्षा व्यवस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात तांत्रिक तृटी निर्माण होते व ज्यांना २० पैकी १० ते १५ मार्क मिळण्याची शक्यता असते त्यांना फक्त १ ते ५ मार्क मिळतात ही कसली परीक्षा पध्दत म्हणावी?हायकोर्टाच्या टायपिंग टेस्टच्या बाबतीत असेही सांगितले जाते की काही ठिकाणी टायपिंग टेस्टचा पेपर फुटल्याचे सांगितले जाते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांनी किंवा बेरोजगार तरुणांनी कोणावर विश्वास ठेवावा यावर सुद्धा सरकारच्या बाबतीत प्रश्न चिन्ह उपस्थित होतो.त्यामुळे विद्यार्थ्यांच्या बाबतीत अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की,"जाये तो जाये कहा" अशी कठीण समस्या दिसून येते.एमपीएससी परीक्षा नेहमी पारदर्शी पद्धतीने व्हायची आणि त्यावर सर्वांचाच विश्वास होता.परंतु आता यातही मोठे भगदाड पडले असुन पेपरफुटी दिसून आली हे राज्याच्या विद्यार्थ्यांच्या व बेरोजगार तरुणांनांच्या दृष्टीने अत्यंत दुर्भाग्यपूर्ण व दुःखद बाब आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने खाद्य एवं औषधी प्रशासन विभाग यामध्ये औषधी निरीक्षक (डीआई) समूह -बी या पदाचा पेपर फुटल्याने औषधी निरीक्षक भर्ती प्रक्रिया रद्द करण्यात आली आहे. यामुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगावर प्रश्न चिन्ह उपस्थित होत आहे.असे सांगितले जाते की,औषधी निरीक्षक भर्ती परीक्षेची प्रश्नपत्रिका राज्यभरात सक्रिय एजंट मार्फत उमेदवारांना ४०-४० लाख रूपयांत विकण्यात आल्याचे सांगितले जाते. आज राज्यात सरकारी नौकरीच्या लाखो जागा खाली आहेत.परंतु सरकारची नियत साफ नसल्याचे पेपर फुटीचा घृणास्पद प्रकारावरून दिसून येते.हा सर्व प्रकार सरकार आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. परंतु गुन्हेगारांवर कठोर शिक्षा किंवा फाशी होत नाही हे राज्याचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.औषध निरीक्षक पाठोपाठ आता "एक्साईज" चाही मार्किंग पॅटर्न आणि पेपर फुटीचा खळबळजनक आरोप होत आहे.यावरून स्पष्ट होते की राज्यात नौकरी भरतीच्या बाबतीत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असुन सरकार फक्त चौकशीची भाषा किंवा समिती तयार करून हात झटकण्याचे काम करीत आहेत ही तरुण युवकांसाठी मोठी समस्या निर्माण झाली आहे. कारण राज्यात पेपर फुटीचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहे;राज्यात पेपर फुटीवरून असे निदर्शनास येते की, सरकारला रीक्त पदे भरायचेच नाही की काय! असे दिसून येते.अशा परिस्थितीत योग्यता प्राप्त विद्यार्थ्यांचा यात नंबर लागणार की नाही हाही प्रश्नच आहे.वरील प्रकरणामुळे सरकारने विद्यार्थ्यांच्या भविष्यापूढे मोठे प्रश्न चिन्ह निर्माण केला आहे.कारण सध्याच्या परिस्थितीत सरकार देशातील आणि राज्यातील राजकारणात पक्ष फुटी,आमदार-खासदार फुटी यावर अवलंबून आहे. त्याचीच पुनरावृत्ती सरकार पेपर फुटीच्या माध्यमातून तरूण विद्यार्थ्यांची व बेरोजगार युवकांची अवहेलना करून स्लोपॉयझनच देण्याचे काम सरकार करीत आहे.अशा गंभीर परिस्थिती अनेक बेरोजगार युवावर्ग डिप्रेशनमध्ये जाऊ शकतो यालाही नाकारता येत नाही. राज्यासह देशात जेन-झी व जेन अल्फां चे हालबेहाल होत आहे, तर दुसरीकडे सरकारने सुभाष चंद्रांना २२ हजार कोटींची कर्जमाफी जाहीर केल्याचे सांगितले जाते.यामुळे कर्ज देणारी एचडीएफसी बँक व एलआयसी सरकारवर आक्रमक झाल्याचे दिसून येते.हाच पैसा सरकारने शाळा महाविद्यालये किंवा आरोग्य सुविधांसाठी वापरला असता तर देशाचा विकास झाला असता.अशाप्रकारे देशाचा अरबोखरबो रूपया पुंजीपतींच्या घश्यात सरकारने टाकुन देशातील युवकांपुढे गंभीर समस्या निर्माण केल्या आहेत. यावरून स्पष्ट होते की, देशाला भ्रष्टाचाराने सर्वत्र जखडले आहे याचे प्रायचित्य आज युवा पिढी पेपर फुटीच्या रूपात भोगत आहे.त्यामुळे पेपर फुटीचे ग्रहण केव्हा सुटणार याची चिंता आज सर्वांना लागली आहे. जय हिंद.

**■ लेखक रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार )

## बीडमध्ये सेवानिवृत्त शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी

# एकनाथ कराड यांची सर्वानुमते निवड

**■ बीड | प्रतिनिधी**

सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटना शाखा बीडची बैठक शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ रोजी सामाजिक न्याय भवन, बीड येथे जिल्हा सरचिटणीस अंकुशराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

बैठकीच्या सुरुवातीला संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष बाबुराव नागरगोजे यांच्या अपघाती निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यानंतर जिल्हाध्यक्षपदाची निवड प्रक्रिया पार पडली. शेंडगे मिठू पिराजी यांनी एकनाथ तुकाराम कराड यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला, तर शिवाजी आनंदराव आव्हाड यांनी अनुमोदन दिले. सूचक व अनुमोदकांच्या प्रस्तावानंतर एकनाथ तुकाराम कराड यांची जिल्हाध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली.

निवडीनंतर उपस्थितांनी नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष एकनाथ कराड यांचे स्वागत केले. बैठकीत संघटनेच्या पुनर्बांधणीबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली. अंबाजोगाई तालुका शाखेच्या पुनर्बांधणीसह जिल्ह्यातील संघटना अधिक सक्षम करण्यासाठी पुढील बैठकीपर्यंत अध्यक्ष व सरचिटणीस यांनी आवश्यक निवडी कराव्यात, असा निर्णय घेण्यात आला. तसेच ३१ डिसेंबर अखेर आणि ३१ मेपर्यंत सेवानिवृत्त झालेल्या सभासदांच्या हायकोर्ट लढा निधीबाबतच्या यादीचे वाचन करण्यात आले. राज्याध्यक्ष मधुकर जंगम सर आणि भगवानराव सोनवणे यांच्याकडे हा



निधी सुपूर्द करण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. परळी तालुक्यातील १८ सभासदांची स्वतंत्र यादी राज्याध्यक्ष मधुकर जंगम यांच्याकडे देण्यात आली आहे. जिल्ह्यातील पहिल्या यादीतील १३८ आणि परळी तालुक्यातील १८, असे एकूण १५६ सभासदांनी विविध समस्यांसंदर्भातील कोर्ट फी भरल्याची यादी बैठकीत वाचण्यात आली. दरम्यान, पुणे येथे दि. ३१ ऑगस्ट रोजी होणाऱ्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीस उपस्थित राहण्याचा निर्णयही सर्वानुमते घेण्यात आला. एकनाथ कराड यांच्या निवडीचे सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व अधिकारी संघटनेच्या विविध स्तरातून स्वागत करण्यात येत आहे.




# मातोश्री चंद्रभागा आश्रमात उत्साहात रक्षा बंधन सोहळा

**■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी :**

परळी येथील मातोश्री चंद्रभागा आश्रमात आज रक्षा बंधनाचा पवित्र कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी आश्रमातील विद्यार्थीनी कु. आनंदी रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या हस्ते संस्थेतील गुरूवर्य ह.भ.प. नामदेव महाराज फड उखळीकर तसेच आश्रमातील सर्व गुरूबंधूंना प्रेमपूर्वक राखी बांधण्यात आली. राखी बांधून परस्परांना शुभेच्छा देत बंधुभाव, प्रेम, आपुलकी आणि संरक्षणाची भावना जपण्याचा संदेश देण्यात आला.

रक्षा बंधन हा केवळ राखी बांधण्याचा सण नसून भाऊ-बहिणीच्या नात्यातील विश्वास, प्रेम, जबाबदारी आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सदैव सोबत राहण्याची भावना दृढ करणारा संस्कारांचा उत्सव आहे. या भावनेला सामाजिक आणि आध्यात्मिक रूप देत आश्रमातील विद्यार्थिनींनी गुरूबंधूंना राखी बांधून हा सण आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा केला.

आश्रमातील विद्यार्थिनी आणि गुरूबंधूंमध्ये यानिमित्ताने स्नेहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले. उपस्थितांनी अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये प्रेम, आदर, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि बंधुभावाची भावना रुजण्यास मदत होते, असे मत व्यक्त केले. या सुंदर उपक्रमाचे आयोजन अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळाचे अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास आश्रमातील विद्यार्थी, गुरूबंधू तसेच मंडळाशी संबंधित पदाधिकारी व भाविक उपस्थित होते. रक्षा बंधनाच्या माध्यमातून नात्यांची वीण अधिक घट्ट करत संस्कारांची परंपरा जपण्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

# स्व. रंजनाबाई देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वृक्षारोपणातून रक्षाविसर्जन; देशमुख कुटुंबीयांचा अनोखा सामाजिक संदेश

**■ परळी वैजनाथ प्रतिनिधी**

परळी शहराचे माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख यांच्या मातोश्री, स्वर्गीय रंजनाबाई रंगनाथराव देशमुख यांचे अल्पशा आजाराने वयाच्या ८७ व्या वर्षी दि. २७ ऑगस्ट रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तिसऱ्या दिवशी देशमुख कुटुंबीयांनी पारंपरिक विधींना पर्यावरण संवर्धनाची जोड देत एक आदर्शवत आणि सामाजिक संदेश देणारा उपक्रम राबविला.

स्व. रंजनाबाई देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ शेतामध्ये वृक्षारोपण करण्यात आले. एक दोन नव्हे तर जवळपास 101 वृक्षांचेरोपन करण्यात आल, यावेळी त्यांच्या रक्षाविसर्जन वृक्षारोपणाच्या माध्यमातून करण्यात आले. एका मातृवत व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती कायम हिरव्यागार राहाव्यात आणि त्यांच्या स्मृतीतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या भावनेतून देशमुख कुटुंबीयांनी हा अभिनव उपक्रम



राबविला. मृत्यूनंतरही निसर्गाशी नाते जोडत, एका वृक्षाच्या रूपाने जीवनाचा संदेश पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा प्रयत्न उपस्थितांच्या मनाला भावून गेला. "एका व्यक्तीची स्मृती केवळ स्मारकातून नव्हे, तर वृक्षांच्या रूपाने जिवंत ठेवता येते," असा प्रेरणादायी संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी देशमुख कुटुंबातील सर्व सदस्य, नातेवाईक तसेच परळी शहरातील प्रतिष्ठित नागरिक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनीही देशमुख कुटुंबीयांच्या या पर्यावरणपूरक आणि समाजाला दिशा देणाऱ्या उपक्रमाचे कौतुक केले. स्व. रंजनाबाई देशमुख या प्रेमळ, मनमिळावू आणि धार्मिक वृत्तीच्या व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ करण्यात आलेल्या या वृक्षारोपणामुळे त्यांच्या जीवनमूल्यांना एक वेगळा आणि चिरंतन अर्थ प्राप्त झाला आहे. दुःखाच्या प्रसंगीही समाजाला विधायक संदेश देत पर्यावरण संवर्धनाचा संकल्प करण्याचा देशमुख कुटुंबीयांचा हा उपक्रम निश्चितच इतरांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
● बीड, रविवार, 30 ऑगस्ट 2026



# पोलिस आपल्या बांधावर उपक्रमातून 20 वर्षांचा शेतीच्या बांधाचा वाद अखेर मिटला

## एसपी नवनीत कॉवत यांचा उपक्रम जिल्हाभरात ठरतोय वरदान

■ **सिरसाळा अतुल बडे**

पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांनी पोलिस आपल्या बांधावर सुरू केलेला उपक्रम बरदान ठरू लागला आहे. पोलिस थेट शेतकऱ्यांच्या बांधावर गेल्यामुळे अनेक वर्षांचे वाद मिटू लागले आहेत. एव्हढेच नाही तर शेतीच्या बांधावरून किंवा शेतीसंबंधी इतर कारणावरून होणारे बाद आणि त्यातून एकमेकां बिरोधात होणारे गंभीर गुन्हे दाखल याला आता आळा बसू लागला आहे. सध्या पोलिस अधीक्षक

नवनीत काँबत यांच्या पोलिस आपल्या बांधाबर उपक्रमाची जिल्हाभरात जोरदार चर्चा सुरू सुरू आहे. सिरसाळा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील मौजे कवळ्याची वाडी येथे गेल्या २० वर्षांपासून दोन भावांमध्ये सुरू असलेला शेतजमिनीच्या बांधाचा बाद पोलिस प्रशासनाच्या मध्यस्थीने अखेर मिटला आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या संकल्पनेतून राबवल्या जाणाऱ्या 'पोलिस आपल्या बांधावर' या उपक्रमामुळे हा

निर्णय शक्य झाला आहे. शिरूर तालुक्यातील पाडळी येथे दहा वर्षापासून शेतीचा बाद होता. तीन दिवसापूर्वी तो दहा वर्षाचा बाद पोलीस आपल्या बांधावर उपक्रमातुन संपुष्टात आला आणि नातवाला अडीच एकर जमीन देण्याचे मान्य केले. त्यानंतर आता सिरसाळा तालुक्यातील कबळ्याचीबाडी येथे ही या उपक्रमामुळे दोन भावातील शेतीच्या बांधाचा बीस वर्षांपासून सुरू असलेला बाद अखेर संपुष्टात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे कवळ्याची बाडी येथे शेताच्या बांधाची तोडफोड करून बांधावरील दगड फिर्यादीच्या शेतात टाकल्याप्रकरणी सिरसाळा पोलिस ठाण्यात एनसी क्र. २४७/२६ व २४८/२६ अन्वये नोंद करण्यात आली होती. या बादाची गंभीर दखल घेत 'पोलिस आपल्या बांधाबर' उपक्रमांतर्गत सिरसाळा पोलिस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक बाबा राठोड व सिरसाळा पोलीसांनी पोलिस पथकाने प्रत्यक्ष

घटनास्थळी भेट दिली. दोन्ही भावांची बाजू ऐकून घेत त्यांच्यातील गैरसमज दूर करण्यात आले व समुपदेशन करून बाद सामंजस्याने सोडवण्यात आला. गेल्या दोन दशकांपासून प्रलंबित असलेला हा वाद मिटल्यामुळे दोन्ही भाबांनी समाधान व्यक्त केले असून पोलिस प्रशासनाच्या या तत्पर व संवेदनशील भूमिकेचे परिसरातून कौतुक होत आहे. एवढेच नाही तर दोन भावातील बांधावरून निर्माण झालेले बेर संपुष्टात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात रुग्णसेवेचा महापूर

## आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून दररोज गरजू रुग्णांसाठी पाठपुरावा

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासनाच्या विविध आरोग्यविषयक योजनांचा लाभ मतदारसंघातील गरजू रुग्णांपर्यंत पोहोचविण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. मुख्यमंत्री सहायता निधी, आयुष्मान भारत योजना तसेच इतर शासकीय योजनांच्या माध्यमातून दररोज रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत मिळवून देण्यात येत असून, आष्टी मतदारसंघात रुग्णसेवेचा हा महापूर पाहायला मिळत आहे.

आष्टी तालुक्यातील जामगाव येथील योगेश धन्यकुमार धस यांच्या वैद्यकीय उपचारासाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून ७० हजार रुपये, तर विशेष बाब म्हणून ३० हजार रुपये, असे मिळून एक लाख रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे. तसेच मातकुळी, ता. आष्टी येथील छाया वीर यांच्या वैद्यकीय उपचारांसाठी मुख्यमंत्री सहायता निधी योजनेतून ८० हजार रुपयांची मदत मंजूर करण्यात आली आहे.

दरम्यान, चोंडी, ता. जामखेड येथील कविता सदाशिव मोरे व सदाशिव बापू मोरे यांचा अपघात झाल्यानंतर त्यांच्या उपचारासाठी आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळवून देण्यात यश आले आहे. हे रुग्ण मतदारसंघातील घुमरी पिंपरी येथील विकास क्षीरसागर यांचे पाहुणे आहेत. या प्रकरणात रुग्णसेवक अमर वाळके, विकास साळवे आणि शरद रेडेकर हे कार्यालयीन पातळीवर मदत व पाठपुरावा करीत आहेत.



### 'राजकारणापेक्षा रुग्णसेवा महत्त्वाची'

**■ ५ ऑगस्टच्या महाआरोग्य शिबिरानंतर फडणवीस सरकारच्या योजनांचा आष्टीतील रुग्णसेवेला अधिक गती आष्टी येथे ५ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून मोफत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून हजारो नागरिकांना विविध आरोग्य तपासण्या, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि पुढील उपचारासाठी मार्गदर्शन मिळाले. त्यानंतर मतदारसंघात गरजू रुग्णांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांना आणखी वेग आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी आ. सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे. गंभीर आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक मदत, आयुष्मान भारत योजनेचा लाभ तसेच इतर शासकीय सुविधांमधून रुग्णांना उपचार मिळवून देण्याचे काम सुरू आहे. 'राजकारणापेक्षा रुग्णसेवा महत्त्वाची' या भावनेतून सुरू असलेल्या या प्रयत्नांमुळे आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळत असून, आष्टी-पाटोदा-शिरूर मतदारसंघात रुग्णसेवेचा नवा अध्याय निर्माण होत असल्याचे चित्र आहे.**

# निकृष्ट दर्जाच्या हिंगावर FSSAIची कारवाई; दोन मोठ्या मसाला ब्रँडच्या विक्रीवर बंदी

■ **मुंबई : वृत्तसंस्था**

ग्राहकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आणि अन्न सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी, भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने (एफएसएसएआय) दोन प्रमुख मसाला ब्रँड्स मे. एव्हरेस्ट फूड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि मे. लालजी गोधू अँड कंपनी (एलजी ब्रँड युनिट) द्वारे उत्पादित 'मिश्रित हिंगा'च्या विक्रीवर मनाईचा आदेश जारी केला आहे. एका विशिष्ट ब्रँडच्या मिश्रित हिंगाच्या गुणवत्तेबाबत ग्राहकाकडून तक्रार प्राप्त झाल्यानंतर, एफएसएसएआयने बाजारातील सर्व प्रमुख ब्रँड्सच्या उत्पादनांची तपासणी करण्यासाठी व्यापक बाजार देखरेख मोहीम सुरू केली. या मोहिमेदरम्यान करण्यात आलेल्या प्राथमिक प्रयोगशाळा चाचण्यांच्या अहवालानुसार, एव्हरेस्ट आणि एलजी या दोन्ही कंपन्यांची मिश्रित हिंगाची उत्पादने निर्धारित गुणवत्ता निकषांची पूर्तता करत नसल्याचे आढळून आले.

एफएसएसएआयने मुंबईतील मे. एव्हरेस्ट फूड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड आणि एलजी ब्रँड युनिट या केंद्रीय परवानाधारक कंपन्यांच्या कारखान्यांमधून थेट कायदेशीर नमुने गोळा केले. हे नमुने पुढील तपासणीसाठी प्राथमिक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले. याशिवाय, एफएसएसएआयने गुजरात राज्याच्या अन्न आणि औषध प्रशासनाच्या (एफडीए) सहकार्याने गुजरातमधील उंबरगाव येथे असलेल्या मे. एव्हरेस्ट फूड प्रॉडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडच्या राज्य परवानाधारक कारखान्याची संयुक्त पाहणी केली आणि तेथूनही नमुने गोळा केले. या सर्व कार्यवाहीदरम्यान गोळा करण्यात आलेल्या मिश्रित हिंगाच्या कायदेशीर नमुन्यांची प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली. या तपासणीतील सर्व नमुने निर्धारित गुणवत्ता निकषांची पूर्तता करत नसल्याचे आढळून आले. (FSSAI Raid)

एफएसएस (अन्नपदार्थ मानके आणि खाद्य पदार्थांमधील संयोजक) विनियम, २०११ अंतर्गत, मिश्रित हिंग हा कच्चा हिंग, डिंक, स्टार्च आणि विविध प्रकारच्या पिठांचे मिश्रण करून तयार केला जाणारा मान्यताप्राप्त प्रकार आहे. या विनियमांनुसार, अंतिम मिश्रित हिंग उत्पादनामध्ये किमान ५ टक्के अल्कोहोल मध्ये विरघळणारा अर्क असणे आवश्यक आहे. हे प्रमाण सुनिश्चित करण्यासाठी त्यामध्ये किमान निर्धारित प्रमाणात कच्चा हिंग वापरणे बंधनकारक आहे.

१. अल्कोहोल मध्ये विरघळणारा अर्क कमी - तपासलेल्या मिश्रित हिंगाच्या नमुन्यांमध्ये अल्कोहोल मध्ये विरघळणारा अर्क केवळ ० ते ३ टक्के आढळून आला. हे प्रमाण अनिवार्य केलेल्या किमान ५ टक्क्यांपेक्षा खूपच कमी आहे. यावरून उत्पादकांनी, अंतिम उत्पादनात आवश्यक असलेल्या कच्च्या हिंगाचा वापर ३० ते ४० टक्क्यांनी कमी केल्याचे स्पष्ट होते.

# जीवनातील प्रत्येक स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी क्रीडा आवश्यक' : पोलीस निरीक्षक अनमोल केदार

## यशासोबत अपयशही पचविण्याची शक्ती खेळातून मिळते' : प्रा. प्रसाद देशमुख
## महिला महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडादिन उत्साहात साजरा

■ **परळी वैजनाथ प्रतिनिधी**

भारताचे महान हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त येथील कै. लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय क्रीडा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. याचवेळी महाविद्यालयाच्या वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन क्रीडाज्योत प्रज्वलित करून करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष संजयजी देशमुख होते. प्राचार्या डॉ. विद्या देशपांडे, संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसादजी देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. विवेकानंद कवडे, कार्यालयीन अधीक्षक सुहास कण्व यांची प्रमुख उपस्थिती होती. संभाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांच्या हस्ते क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील विविध क्रीडा स्पर्धांच्या वेळापत्रकाचे अनावरणही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्व. शामरावजी देशमुख व मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्यानंतर क्रीडाज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महाविद्यालयाची विद्यार्थिनी राजनंदिनी



गित्ते हिची क्रीडाप्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात आली. तिने उपस्थित विद्यार्थिनींना क्रीडा प्रतिज्ञा दिली. खेळात पराभव झाला तरी खचून न जाता पुढील विजयासाठी प्रयत्नरत राहावे, असे मत तिने व्यक्त केले. पोलीस निरीक्षक अनमोल केदार यांनी मार्गदर्शन करताना, जीवनात सर्वांगीण प्रगती साधण्यासाठी क्रीडेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. खेळामुळे शरीराचा सर्वांगीण व्यायाम होतो. मन व शरीर प्रसन्न ठेवण्यासाठी तसेच जीवनातील प्रत्येक स्पर्धेत यशस्वी होण्यासाठी क्रीडा आवश्यक आहे, असे प्रतिपादन केले. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे कोषाध्यक्ष प्रा. प्रसाद देशमुख यांनी "क्रीडा हा जीवनाचा अविभाज्य घटक आहे. विद्यार्थिनींनी कला व क्रीडा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा. खेळामुळे यशासोबतच अपयश पचविण्याची क्षमता निर्माण होते," असे सांगितले. निरोगी जीवनासाठी विविध खेळांचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी वार्षिक क्रीडा महोत्सवासाठी विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभागप्रमुख प्रा. डॉ. प्रवीण दिग्रसकर यांनी केले. मेजर ध्यानचंद यांनी परतंत्र भारतातही आपल्या उत्कृष्ट खेळाच्या जोरावर देशाला गौरव मिळवून दिला. विद्यार्थिनींच्या सर्वांगीण जडणघडणीत खेळाचे महत्त्वाचे स्थान असून सर्वांनी क्रीडा स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ विभागाचे राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. प्रवीण फुटके यांनी केले. यावेळी क्रीडा विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक सुहास कण्व यांचा विशेष सत्कार करण्यात आला. हिंदी विभागाच्या डॉ. राजश्री कल्याणकर यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

यावेळी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# आ. सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांना यश.. करंजी (पांढरी) प्रकल्पातील पाणी बंदिस्त नलिका प्रणालीद्वारे जामगाव तलावात सोडणार..

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी-पाटोदा-शिरूर विधानसभा मतदारसंघातील सिंचन व्यवस्थेला बळकटी देण्यासाठी भाजपा आमदार सुरेश धस यांच्या विशेष प्रयत्नांना आणखी एक महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. आष्टी तालुक्यातील करंजी (पांढरी) लघुपाटबंधारे तलावाच्या डाव्या कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये (PDN) रूपांतर करून होणाऱ्या पाणी बचतीतून जामगाव पाझर तलावामध्ये पाणी सोडण्याच्या प्रस्तावाला महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाने तत्त्वतः मान्यता दिली आहे..

जलसंपदा विभागाने दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी शासनाच्या उपसचिवांच्या स्वाक्षरीने याबाबतचे पत्र जारी केले आहे. या निर्णयामुळे आष्टी तालुक्यातील सिंचनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या करंजी (पांढरी) प्रकल्पाच्या पाण्याचा अधिक कार्यक्षम वापर होण्याबरोबरच जामगाव पाझर तलावाला पाणी उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

शासनाच्या पत्रानुसार, करंजी (पांढरी) लघुपाटबंधारे प्रकल्पाचा डावा कालवा बंद नलिका प्रणालीमध्ये रूपांतरित करण्यात येणार आहे. या प्रक्रियेमुळे होणाऱ्या पाणी बचतीचा वापर करून डाव्या कालव्यामधून अतिरिक्त नवीन विमोचकाद्वारे जामगाव पाझर तलावामध्ये बंद नलिका प्रणालीच्या माध्यमातून पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी आवश्यक असलेले सर्वेक्षणाचे काम विस्तार व सुधारणांतर्गत प्रस्तावित करण्यास शासनाने तत्त्वतः मान्यता दिली आहे. तसेच महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात सर्वेक्षणाच्या कामासाठी उपलब्ध असलेल्या प्राथमिक सर्वेक्षणाच्या ठोक तरतुदीतून हे काम हाती घेण्यासही शासनाने मान्यता दिली आहे.



### पाण्याचा कार्यक्षम वापर होणार

आष्टी तालुका हा पर्जन्यमानाच्या अनिश्चिततेमुळे वारंवार दुष्काळसदृश परिस्थितीला सामोरा जातो. त्यामुळे उपलब्ध जलसाठ्याचा काटकसरीने व अधिकाधिक कार्यक्षम वापर करणे गरजेचे आहे. कालव्याचे बंदिस्त नलिका प्रणालीमध्ये रूपांतर झाल्यामुळे पाण्याची वाहतुकीदरम्यान होणारी संभाव्य गळती व बाष्पीभवनामुळे होणारी हानी कमी होण्यास मदत होणार आहे. बचत होणाऱ्या पाण्याचा उपयोग जामगाव पाझर तलावासाठी करण्याचा प्रस्ताव असल्याने या परिसरातील सिंचन व्यवस्थेलाही त्याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे करंजी (पांढरी) प्रकल्पातील पाण्याचा अधिक शास्त्रशुद्ध आणि कार्यक्षम वापर होऊन जामगाव परिसरातील जलसाठा व सिंचन क्षमतेला चालना मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पुढील सर्वेक्षण व तांत्रिक प्रक्रियेनंतर प्रत्यक्ष कामाला गती मिळणार असल्याने शेतकऱ्यांसाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)